# प्रभुतरुण


| वर्ष ५३ | अंक २ | मुंबई | सप्टेंबर, २०१९ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**


## कृतज्ञ स्मरण



**श्री. सुहास विष्णुपंत कोठारे**

हा अंक गणरायाच्या आरत्या दुमदुमताना (किंवा त्यानंतर) हाती पडेल. दरवर्षी गणराय येतात, नेमाप्रमाणे परत जातातही. पण त्याची 'आबोहवा' घरीदारी, गल्लीबोळात, वाडी-सोसायटीत तयार होतेच होते. दोन, दोन मजल्यांच्या उंचीचे सार्वजनिक गणपती आगमनाआधी रस्त्यारस्त्यांतून मिरवणूकीने जातात. मोबाइलवर त्यांचे फोटो निघतात. त्यांची शास्त्रशुद्ध स्थापना होण्याआधीही रस्तोरस्ती त्यांच्यावर अक्षता (उडवल्या) वाहिल्या जातात. याला कारण गणरायाच्या आगमनाबरोबर आपल्या मनात सळसळता, सकारात्मक उत्साह संचारलेला असतो. म्हणून स्थापनेनंतर आरत्यांचा माहोलच तयार होतो. गणपतीबरोबरच शंकर, विठ्ठल, देवी... सगळ्याच आरत्यांची उजळणी होते. कारण या आरत्यांमधून मनातील भाव उजळत असतो. ती शब्दब्रह्माची उपासना असते. शिवाय आरतीत सामूहिक ताकद सामावलेली असते.

अशा या आरत्या बाराव्या शतकापासून आढळतात. शके ११७२ च्या तासगाव येथील ताम्रपटातही आरतीचा उल्लेख आहे. 'देवासि निल पंचामृत त्रिकाळ धूपारति नैवेद्यु दीपावर्ति पुष्पे।' असे शब्द तिथे आढळतात. बहुतेक आरत्यात उपास्यदेवतेचा जयजयकारच असतो. शिवाय 'ओवाळू' 'ओवाळीन' अशा अर्थाची ग्वाही असते. आराध्य देवतेचे मूर्तिवर्णन, चारित्रगायन आणि उद्धाराची याचना करणारी आरती हे देवतेचे सामूहिक स्तोत्रच असते. आरतीत जेव्हा मूर्तिवर्णन येते तेव्हा अंगोपागांचे वर्णन तिथे असते. म्हणजे मस्तकी मुकुट असतो, कपाळी सिंदूरतिलक असतो, कंठी माळ शोभते, चरणी नुपूर किंवा घागरिया रुणझुणतात. गणपतीच्या आरतीत यज्ञोपविताचाही (जानव्याचा) उल्लेख असतो. वस्त्रं असतात. पिवळा पितांबर, लाल शेला. दागदागिने येतात. लाडू, मोदकासारखे खाद्यपदार्थ असतात. त्यांचे नर्तन असते. त्यांचे चरित्रात्मक पराक्रम असतात. सगुण साकार मूर्ती आरतीत आळविताना नाममहिमा असतोच. काहीवेळा गणपतीच्या सर्वसमावेशक उदराची महत्ता वर्णन करताना 'लंब उदर ज्याचे। भरले चौदाविधीं। चौसष्ट कळी साचें।।' अशी अतिशयोक्तीही येते; जशी 'उचलुनि शुण्डाग्रातें त्रैलोक्या धरिसी।।'' या ओळीतही ती आहे. पण तरीही आरतीतील सगुण रूप दाखविताना (स्वभावोक्त) तंतोतंत जीवंत चित्रणही येते; हे महत्त्वाचे.

उदा : - उंदरावरि बैसोनि दुडदूडा येसी।
हाती मोदक लाडू ठमकत ठमकत मग चाले।
हालत हालत दोंदिल डोलत मग चाले।। किंवा
अखंड आनंदे तू डोलविसी माथा।
तांडवनृत्य करिसी तातक् थिम् ताथा।। या गोसावीनंदनाने वर्णिलेल्या पंक्तीत तर नृत्याचे बोलही गणपतीची नर्तनमूर्ती साकार करतात. जसे काही 'गणराय नर्तन करी' म्हणजे काय; याचा चित्रमयी प्रत्ययच येत रहातो. माणिकदासाने केलेल्या गणपतीच्या आरतीतही जीवंत, चलत्‌चित्र आपल्यासमोर साकार होते - 'लप लप लप लप लप लप हालति गजशुंडा। गप गप मोद भक्षिसी घेऊनि करि उंडा।।' या त्यांच्या ओळीत गणपतीबरोबर गजही (हत्तीही) सोंड हालवत नृत्य करताना गतिमान होतो. अशावेळी 'लपलप'ची लय केवळ अनुप्रासात्मक नाही; तर ते दृश्यचित्र आहे. विरोधाभासाची गंमत म्हणजे हत्ती बेभान नाचतोय, आणि गणपती मोदकाचा उंडा हातात घेऊन खातोय! हे चित्रण समूहगानासाठीसुद्धा उच्चारणलय साधणारे आहे.

## संपादकीय

## गणपतीबाप्पा मोरया

—सुहासिनी कीर्तिकर

सगुण रूप आरतीतून साकारताना, आराध्य दैवताचे वर्णन, चित्रण करताना त्याची महती इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे असाही भाव आरतीकारांच्या मनात असतोच. त्यामुळे भक्तिभावपोषक असे व्यतिरेक करणारे वर्णन येत जाते. पहायचेच आहे का? पहा. 'कर्णी कुंडले देखुनि रविशशी लपताती' किंवा' ऐसे वैभव तूझे नाटक नृत्याचें।

''देखुनिया लुब्धले मन गंधर्वांचे।।'' या ओळींत भक्ताला उपास्य दैवतच श्रेष्ठ दाखवायचे असते. कारण 'आरती'तील आर्तता त्यामुळे काव्यम होत जाते. आरती सुश्राव्य असावी म्हणून बहुतेक आरत्यात अनुप्रास तर असतोच असतो. अगदी आपल्या ओळखीच्या 'सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची नुरवी, पुरवी प्रेम' मध्येही तो आहे ना? त्यामुळेच काही आरत्यांत विरोधावर आधारलेला कल्पनाविलासही पहायला मिळतो. जसे की - वासुदेवकृत गणेशाच्या आरतीत असे चित्रण येते -

शिवतनया वक्रतुंडा गौरीच्या बालका।
ओवाळूं तुजलागीं विश्वाच्या पालका।
गिरिजांकी बैसुनिया प्रेमाने खेळसी।
वधुनिया राक्षसाला लीलेतें दाविसी।।

म्हणजे - दोन्ही ओळींत पहिल्या चरणात गणपतीचे बालरूप आहे, दुसऱ्या चरणात तारक रूप आहे. दुसऱ्या गणेशाच्या आरतीतही याचाच प्रत्यय येतो आपल्याला -

'गिरिजांकी बैसुनिया स्तनपान करिसी। तो तूं राक्षस मोठमोठे निर्दलिसी।।
उचलुनि शुण्डाग्रातें त्रैलोक्य धारिसी।
गिरीजारागें नित्य कां रे थरथरसी।।

असे गणपतीचा पराक्रम आणि त्याचे बालरूप एकत्रितपणे आरतीत येते. पहाताना आरतीकर्त्याच्या वर्णन शैलीचे कौतुक वाटल्यावाचून राहवत नाही. आरतीकर्ता केवळ रचना म्हणून याकडे पहातच नाही ना! त्याची स्वत:ची अवस्था उन्मनी असते. ''मूर्ति अवलोकितां न ढळतीं पाती।। (पाती = डोळ्यांच्या पापण्या) असे जनपंडित म्हणतो तेव्हा 'आर्ततेने गायिली जाणारी ती आरती' ही सोप्पी व्याख्या आपल्या प्रत्ययास येते. (संस्कृत अर्तिक्य शब्दावरून आरती शब्द आला असे मानले जाते. पण त्यातील आर्तता पाहता आर्ततेने गायिली जाणारी ती आरती; असेच घ्यावे आपले) हे 'विश्वाचे आर्त' समूह गानातून समूहभान म्हणून येते तेव्हा तो सामाजिक उत्सव होतो. गणपतीच्या दिवसात अशीच उत्सवी भावना असते; ती त्यामुळेच.

या सर्वच आरतीकारांनी सगुण रूप पाहिले, चिंतले आहे. म्हणूनच आरतीत दृश्यभान, वर्णन येते. मोरया गोसावींची ही पुढील आरती अनेकांच्या परिचयाची असेलच...

''सुंदर मस्तकीं हो, मुकुट दिसे साजिरा।
विशाळ कर्णद्वय, कुण्डलें मनोहर।
त्रिपुंड्रटिळा भाळीं, अक्षता ते सोज्वळी।
प्रसन्नमुखकमळ, मस्तकीं दुर्वांकूर।।१।।
नयन निर्मळ हो, भुंवया अति सुरेख।
एकदंत शोभताहे, जडित स्वर्ण माणिक।
बरवी सोंड सरळ, दिसतसे अलौकिक।
तांबूल मुखिं शोभे, अधर रंग सुरेख।।२।।
चतुर्भुजमंडित हो, शोभती आयुधें करीं।
परशुकमल अंकुश हो, मोदक पात्र भरी।
अमृतसम मधुर, सोंड शोभे तयावरी।

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

मूषकवाहन तुझें, लाडू भक्षण करी।।३।।
नवरत्नहार कंठी, यज्ञोपवीत सोज्वळ।
ताईत मिरवीतसे, त्याचा ढाळ निर्मळ।
जाईजुई नागचांफे, पुष्पहार परिमळ।
चंदनी कस्तुरीचा टिळा, शोभे टिळक वर्तुळ।।४।।

अगदी बारीकसारीक तपशीलासह साकारलेली ही आरती आपल्या घरच्या गणपतीचेच साक्षात् वर्णन वाटतेय ना?

जाता जाता मुक्तेश्वरांच्या आरतीतील नादछंदाचे उदाहरण दिल्याशिवाय रहावत नाही - सारीगमपधनी सप्तस्वर भेदा।
धिमिकिट धिमिकिट मृदुंग वाजति गतिछंदा।
तातक् तातक् थैय्या करिसी आनंदा।।''

तर मित्रांनो; अशी सूरमयी, नादमयी, चित्रमयी, भावमयी आर्त आरती. संपादकीयात गणपती आणि गणपतीच्या आरत्यांविषयी लिहिण्याचे एक ज्ञातीय प्रयोजन आहे. श्री. विश्वास नारायण अजिंक्य यांच्या घरच्या गणपतीचे यंदाचे १७५ वे वर्ष आहे. म्हणजे १८४५ पासून हा गणराय त्यांच्या घरी येतो. त्याविषयी इतरत्र मजकूर आहेच. तर सर्वजण एक दिलाने, मनापासून म्हणूयात 'गणपतीबप्पा मोरया'।

*

## पाठारे प्रभु महिला समाज

* समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २५ ऑगस्ट २०१९ रोजी समाजाध्यक्ष सौ. नीता सेंजित यांच्या अध्यक्षतेखाली प्रभु सेमिनरी हॉल, ठाकुरद्वार येथे पार पडली. या सभेत सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. याचवेळी हस्ताक्षर, निबंध आणि काव्य अशा तीन स्पर्धा घेण्यात आल्या. निबंध आणि काव्य स्पर्धांचे निकाल नंतर जाहीर करण्यात येतील. हस्ताक्षर स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे:-

प्रथम पारितोषिक - कु. शलाका नीलेश विजयकर

द्वितीय पारितोषिक - श्रीम. मुग्धा विजयकर आगासकर

तृतीय पारितोषिक - सौ. स्वप्ना विनित विजयकर

हस्ताक्षर स्पर्धेचे परीक्षण समाजाच्या विश्वस्त श्रीमती. स्वाती जयकर यांनी केले. या प्रसंगी सर्व उपस्थितांना कॉफीपानाचा लाभ झाला.

* पा. प्र. महिला समाजाचा १०५ वा स्थापनादिन रविवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी दुपारी ठीक ४ वाजता पा. प्र. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृह, १२ वा रस्ता, खार (प.) येथे सौ. पूनम माधव कुर्डेकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात येईल. वर्धापनदिनानिमित्ताने श्री. विनायक जोशी यांची 'स्वरभावयात्रा' आयोजित केली आहे. 'राधे तुझा सैल अंबाडा' ते 'राधा ही बावरी' पर्यंत ही यात्रा विनायक जोशी सादर करतील. संकल्पना, संहिता, निवेदन आणि गायन सबकुछ विनायक जोशी यांचेच असेल. साथीला गिरीश प्रभू, ऋषिराज साळवी असतील. या प्रसंगी सर्वांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

* दिनांक १९ ऑक्टोबर २०१९ रोजी समाजाच्या शिवणवर्गात सायंकाळी ५ वाजता दिवाळी निमित्त ज्ञातीतील गरजू भगिनींना लुगडी वाटप करण्यात येईल. भगिनींनी आपले अर्ज सोमवार दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत संयुक्त चिटणीस सौ. रश्मा विजयकर यांचेकडे आणून द्यावेत (त्यांचा पत्ता - १९, सेठ ब्लॉक्स, नवरोजी स्ट्रीट, मुंबई ४००००२.) फोन : २२०१३८८३ - ९८२०९८१८८२

*

**ललित बंध**

# खरेदी

**-सौ. उज्ज्वल ब्रह्मांडकर**

पूर्वी खरेदी मग ती कोणतीही असो खूप सोपी होती. वस्तू, वस्तूंचे प्रकार सगळं ठोकळेबाज, मर्यादित होतं. मोटारी म्हणजे लँडमास्टर, ॲम्बेसेडर, हिंदुस्तान, पोटिॲक, हिलमन मिंक्स, ओल्डस मोबाईल, फोर्ड, इंपाला, शेव्हरोलेट, मर्सिडीज इ. मोजके प्रकार. त्यांची तीच ती ठराविक मॉडेल्स. तेच फ्रीज, टी.व्ही.चं. आता तंत्रज्ञानानुसार प्रत्येक मॉडेल अशी एकाच कंपनीची खूप मॉडेल्स असतात. कंपन्यांची संख्याही बेसुमार. हीच गोष्ट आजच्या जीवनातील प्रत्येक वस्तूची.

पूर्वी जाहिरातीही मर्यादित असायच्या. जाहिरातींची माध्यमंसुद्धा कमी होती. आता सणासुदीच्या एक महिना अगोदरपासून रोजच्या रोज वर्तमानपत्रांची सुरुवातीची सहा सहा पानं भरून आणि आतल्या अनेक पानांवर जाहिरातीच जाहिराती असतात. टीव्हीवर सतत एक-दीड मिनिटानंतर जाहिरातींचा भडिमार सुरूच असतो. इंटरनेटवर तर बघायलाच नको. तंत्रज्ञान जेवढं वाढतंय तेवढ्या त्यांच्या जाहिरातीही किचकट, सामान्यांना न समजणाऱ्या.

प्रत्येक गोष्ट आता आवश्यक नव्हे; अत्यावश्यक या सदरातच मोडतेय. पूर्वी स्टेटस सिम्बॉल असणाऱ्या सर्व गोष्टी आता सामान्यांच्या घरात त्यांना आवश्यक वाटतायत. गरज, चैन आणि उधळपट्टी या पायऱ्या संपून आता उधळपट्टी हीच एकमेव पायरी गरज म्हणून ओळखली जातेय. प्रत्येक वस्तूचं प्रत्येक मॉडेल म्हणजे एक स्वतंत्र पॅकेज. ह्या मॉडेलमध्ये इतकं इतकं मिळेल पण अमुक तमुक नसेल. दुसऱ्या मॉडेलमध्ये ते असेल तर अगोदरच्या मॉडेलमधलं काहीतरी नसेल. अशा अनेक विभागत्या प्रतवारीसुद्धा. तंत्रज्ञानामधल्या तज्ज्ञांचंसुद्धा डोकं भणभणून जातं-तिथं सामान्यांची काय कथा? हे घ्यावं की ते? काय नसेल तर चालेल? किंवा आपल्याला नक्की काय हवंय कळतच नाही.

तीच गोष्ट सध्या केशतेलाची. पूर्वी फक्त खोबरेल तेल, ब्राह्मी तेल, माक्याचं तेल किंवा टाटाचं सुवासिक तेल एवढंच होतं. केस लांबसडक, घनदाट, काळेभोर व मजबूत राहण्यासाठी एकच तेल असायचं. आता केसांच्या प्रत्येक प्रकारासाठी वेगवेगळी तेलं आणि वेगवेगळे शॅम्पू. पूर्वी शिकेकाई, आवळकाठी, नारळाचं दूध व लिंब एवढेच प्रकार केस धुण्यासाठी होते. तरीही सर्वांचे केस मस्तच असायचे.

तंत्रज्ञान, आकार, प्रतवारी याप्रमाणे किंमती असतात. जुनं तंत्रज्ञान मागे पडत चाललंय. दर दोन वर्षांनी तंत्रज्ञान बदलतंय. आता साधे मोबाईल्स खूपच थोड्या प्रमाणात मिळतायत. अजून तरी फक्त स्मार्ट टच फोनच बाजारात मिळतायत अशी परिस्थिती नाहीय. पण तसं होण्याची वेळ जवळ मात्र आलीय. सतत, दर सेकंदाला संपूर्ण कॉम्प्युटरच हाताशी असणं आता आवश्यक (?) वाटू लागलंय. उद्योगपतींची गोष्ट वेगळी. सामान्यांना काय करायचंय ते? पण दुसरे वापरतायत नं! मग आपल्याकडे हवंच.

पूर्वी माणसाच्या शिक्षणाला, कर्तृत्वाला मान होता. अजूनही थोडाफार आहे. त्यांचंच काय; पण सामान्यांचं मूल्यमापनही आता त्यांच्या मनगटावरचं घड्याळ कोणतं आहे, हातात सोन्याच्या किती किंवा हिऱ्याची मोठी अंगठी आहे की नाही, सोन्याचं ब्रेसलेट पुरूषांच्या हातात आहे की नाही, हातात कोणता फोनआहे ('साधा' 'छत्तीस' हजारांचा की 'त्रेसष्ट' हजारांचा आयफोन?) मोटार कोणती आहे, स्वतः चालवतोय की शोफर ड्रिव्हन, कोणत्या कापडाचे कपडे - शर्ट, पँट, सूट आहेत, फॅशन कोणती आहे, पायात किती हजारांचे बूट आहेत या गोष्टींवरून होत असतं.

घरात साधे बल्बज् जाऊन वीज बचतीच्या नावाखाली सी.एफ.एल. आले. आता एलसी.डी.चाच जमाना आहे. किंमतीकडे बघायचं नाही. साधा कलर्ड टिव्ही काही काळानं मिळणारच नाही. एल.सी.डी.टी.व्हीच मार्केटमध्ये असणार.

साध्या मोटर बाईक्स बघायला तरी मिळतायत का? आता जमाना आहे हाय-फाय मोटारबाईक्सचा. लहान मुलांच्या साध्या सायकलींमध्येसुद्धा बिनगिअरची, गिअरवाली, पुढे सामान ठेवण्यासाठी बास्केट असणारी अशा किमान चारसाडेचार हजारांच्या सायकली आल्यायत.

आता बाजारपेठ फक्त श्रीमंतांसाठीच आहे असं म्हटलं तर वावगं ठरू नये. टीव्ही.च्या किंमती सव्वादोन लाख, साडे चार लाख, फ्रीजची किंमत (१००१ लीटरचा) दोन लाख नव्याण्णव हजार नऊशे नव्याण्णव फक्त. चांगल्या ऑफिसवेअर साड्या किमान आठशे, नऊशे रुपये, साधी प्युअर सिल्क हजाराच्या खाली ? (काहीतरीच काय ?) आता आमच्या पिढीला साध्या साध्या वस्तू मिळणं दुरापास्त झालंय. पूर्वीचं चार आठ आण्यांचं बटाट्याचं सोलाणं - रूप तेच, आकार तोच पण किंमत वीस रुपये, ते मॉडेलसुद्धा मुष्किलीनंच मिळतं. आता सर्रास मिळतात ती पन्नास रुपयेवाली. टिकतात पूर्वी इतकीच किंवा तितकीही नाहीत.

साधी दिवाळीच्या कंदिलांची गोष्ट घ्या. रस्त्यावरचा साधा कागदी कंदील पाचशे रुपये. डिझाईनर कंदिलांचं एअरकंडिशन्ड दुकान बघितलं. अगदीच छोटे, साधे कंदिल दीडशे रु.ला. डिझायनर कंदिलांच्या किंमतींची सुरुवातच होते नऊशे रु. पासून ती तब्बल सतराशे, अठराशेपर्यंत जाते. मोत्यांच्या माळा लावलेल्या कंदिलांची किंमत विचारायलाच नको. (मोत्यांचे कंदिल? कंदिलांची मूळ संकल्पनाच इथे लोप पावते) कंदिलांची एवढी किंमत? कल्पनाही सहन होणार नाही तिथं ती चक्क वस्तुस्थिती बनलीय.

घराच्या किंमतीही तशाच न परवडणाऱ्या. सगळीकडे अफाट वस्तू, अफाट बाजारपेठा व वस्तूंच्या अफाट किंमती एवढंच दिसतं तेही सगळं 'गरजेचं'. अशा परिस्थितीत माणसं कर्ज-बाजारी होणं, नैराश्यानं वेढली जाणं, चुकीच्या मार्गाने पैसे मिळवण्याचा मार्ग त्यांनी आपलासा करणं, परिणामी सर्वच क्षेत्रांत भ्रष्टाचार वाढणं हे ओघानंच आलं. खूप पूर्वी म्हणजे साठच्या दशकात बँकेमधला सहासष्ट हजारांचा फ्रॉड खूपच गाजला होता. अजूनही आमच्या पिढीला आठवतोय. आता रोजच्या रोज सर्वकडे होणाऱ्या भ्रष्टाचारांचे आकडे 'काही हजार कोटी' असेच प्रत्येकी आहेत. नको असतानाही कधी सेल लागलाय म्हणून, कधी दुसरा घेतोय म्हणून, कधी वस्तू जुनी (फक्त तीन चार वर्षं जुनी) झाली म्हणून 'खरेदी' केली जाते तीही वाट्टेल ती किंमत देऊन.

(पान ५ कॉलम ३ वर)

*

भवताल

# कलियुग... सामाजिक वावटळ

**-प्रणिता प्रभाकर**

सन २०१९ चा हा नववा महिना चालू आहे. जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांच्या कालावधीत आपल्या आयुष्याच्या वाटेवरील अनेक कंगोरे उलगडून त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला; परंतु , आजच्या अंकात सामाजिक वावटळीविषयी लिहिण्याचा छोटासा प्रयत्न करणार आहे.

सामाजिक वावटळ म्हणजे तरी काय? वावटळ म्हणजे वादळ! आणि सामाजिक वावटळ म्हणजे समाजात उद्‌भवणारे वादळ होय! ह्याविषयी थोडे सिंहावलोकन करूया.

स्त्री व पुरुष हे देवानेच जन्माला घातलेले मानवी अवतार आहेत. पूर्वापार स्त्रीजाती ही आपल्या समाजात गौण मानली जात होती व आजही येनकेन प्रकारेण तिला गौणच मानले गेले आहे. पूर्वी स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या. चूल व मूल ह्यापलीकडे तिला विश्वच नव्हते. तिच्या मनाचा कोणीही कधीही विचार केला नाही. फक्त चूल-मूलच नव्हे तर; संसार कोणाशी करावा हे वडीलधारी माणसे ठरवणार म्हणजे अर्थातच घरातील पुरुषमंडळी. बाकी घरातील स्त्रिया फक्त ‘मम’ म्हणणार! तेव्हा तर मुलींची लग्ने लहान वयात करत असत. म्हणजे अर्थातच अजाणत्या वयात होत असत. खेळण्या-बागडण्याच्या वयात भातुकलीचा संसार न थाटता आपल्यापेक्षा वयाने थोराड असलेल्या मुलाशी नव्हे; तर जख्खड म्हाताऱ्याशी लग्न लावून दिले जात असे. त्या काळात पुरुषांना एकदा नाही, दोनदा नाही तर अगणित वेळा लग्न करण्याची मुभा होती. आणि त्याच्या उलट स्त्रियांची परिस्थिती! थोराड माणसाशी लग्न लावून दिले आणि तो गचकला की त्या बालवयातील मुलीला संपूर्ण आयुष्य लाल लुगड्यात म्हणजे आलवणात आणि बोडकी म्हणून घालवावे लागत असे. त्याहीपूर्वी तिला स्वेच्छेने नव्हे तर सामाजिक बांधीलकी म्हणून सती जावे लागत असे. पदरात लहानगी असतानाही त्यांना तिला जबरदस्ती पोरके करावे लागत असे... समाजाखातर.

वाचकहो, तुम्ही म्हणाल की; तेव्हाच्या संस्कृतीप्रमाणे किंवा संस्कृतीनुसार तेव्हाची ती एक समाजरचनाच होती. मान्य! असेलही; परंतु तेव्हा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन म्हणजे एक मुके जनावर होय! जिला मन असूनही-वाणी असूनही अव्यक्तपणे जीवन जगण्याची तिला समाजाने एक प्रकारची दहशतच घातली होती म्हणायची. असो! त्यानंतर अनेक समाजधुरिणांनी सामाजिक सुधारणा केल्या; जेणेकरून स्त्रियांचा दर्जा उंचावला! तिला एक व्यक्ती म्हणून जगण्याची मुभा मिळाली . शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले तिच्यासाठी. हे सहज सोपे झाले नाही; तर त्या करिता अनेकांना आपल्या सौख्याची आहुती द्यावी लागली. हे तर सर्वश्रुत आहेच. तसेच इतिहासातही कोरले गेले आहे. परंतु ते आता इतिहासजमा झाले असे आजची पिढी म्हणतेय.

आज आपण डोळे उघडे ठेवून जगाकडे पाहिले तर स्त्रियांच्या केलेल्या त्यावेळेसच्या उद्धाराने, त्यांची होत गेलेली प्रगती आपल्याला एकीकडे दिसून येते. म्हणूनच म्हणतात की, एक पुरुष शिकला तर एक व्यक्ती शिकते परंतु एक बाई शिकली तर अख्खें घर शिकते. त्यामुळे सामाजिक प्रगतीकरिता स्त्रीशिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे, नव्हे; दिले गेले आहे. आज स्त्री ही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून गगनभरारी घेण्याची स्वप्ने नुसती पाहात नाही, तर ती प्रत्यक्षात उतरवताना आपण पाहात आहोत. जसे इंग्रजीत म्हणतात की, Behind every successful man there is a woman तसेच आपण म्हणू शकतो की, Behind every successful woman there is a man. ह्या उक्तीप्रमाणे खरोखरच जर आजच्या प्रत्येक यशस्वी स्त्रीच्या पाठीमागे पुरुष उभा असेल तर मग आजच्या जगात स्त्रीची अशी परवड का होताना दिसतेय? परवड म्हणजे आज तिने चारी बाजू चीत केल्या असल्या तरीही तिचे जगणे सुरक्षित नाही.अगदी अजाण बालिकेपासून ते वयोवृद्धेपर्यंत.तिच्या आजूबाजूला माणसे नाहीत तर जंगली श्वापदे फिरतात की काय असे वाटते? तिला कितीही समानतेचा दर्जा देण्यात आला तरीही, समाजाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललाय असे चित्र दिसत नाही. ती एक उपभोग्य वस्तू म्हणूनच तिच्याकडे पाहिले जाते.एक जीती/जागती जीवंत वस्तू होय!

आजच्या अणू--रेणूच्या काळात आणि संगणकीय युगात सामाजिक स्तरावर बदल घडून येण्याची अपेक्षा प्रत्येकाने उराशी बाळगली असेल किंवा बाळगतही असतील. परंतु सद्यस्थिती किंवा प्राप्त परिस्थिती असे दृष्टीस आणून देत नाही. मान्य आहे, स्त्री आजच्या युगात अबला नसून तिचा झोका उंच जातो आहे. इतकेच नव्हे तर आपण पाश्चिमात्य देशांचे सगळ्याच बाबतीत अनुकरण करतोय. मग तिने तसा वेष परिधान केल्यास त्यात तिची काय चूक? ह्याबाबतीत काही पुराणमतवादी विचारांचे महाभाग स्त्रीलाच दूषण देताना दिसतात. ती तसे कपडे घालते, ती नखरा करते म्हणून समोरचा उद्दिपीत होतो अशी वक्तव्ये करताना ऐकिवात येतात. परंतु त्यात तिचा काय दोष? व्यक्तिस्वातंत्र्य म्हणून काही आहे की नाही? की ती

(पान ६ कॉलम ३ वर)

पान उलटताना

# इडियट बॉक्स

**-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर**

टोपणनाव दिल्याशिवाय आपल्याला चैनच पडत नाही. माणसांना आपण पब्लिक म्हणतो. मुलांना पोरं म्हणतो. वडिलांना बाप, आईला म्हातारी, नवऱ्याला नवरोबा, बायकोला आमची ही, इतरांना बावळ्या, कावळ्या, चिचुंद्री, बया, बाप्या, गिधाड, सटवी, टोणगा, ढापण्या आणखी अनेक प्रेमाने आपण लाल्या, चिंगुली, पिंकी, रिंकी, बबल्या, गोट्या, चिंगी, सोनुली, अशी कानांना गोड वाटणारी नावेही ठेवतो. पण वस्तूंना आपण सहसा टोपणनावं ठेवत नाही. म्हणजे टेबलोबा, खुर्चुली, पेनोबा, पेन्सुली अशी टोपणनावं सहसा ऐकिवात नसतात. पण टी.व्ही. ही आपल्याला वस्तू वाटली नाही. व्यक्तीच वाटली जणू. म्हणून जगात टी.व्ही. अवतीर्ण झाल्या-झाल्या आपण ‘इडियट बॉक्स’ असं त्याचं बारसं करून देखील टाकलं.

आपल्या हातात स्मार्ट फोन आल्यावर आपण फारच स्मार्ट झालो. पण त्यामुळे टी.व्हीचं महत्त्व फारसं कमी झालं नाही. किंबहुना त्याच्या वाहिन्या वाढत गेल्या, तसा तो जास्तच इडियट होत गेला. दादांनी टी.व्ही घेतला तेव्हा ते ‘छाया-गीत’ पाहायला धावत पळत घरी यायचे. पण आई आतल्या खोलीतून बाहेरही यायची नाही. सिनेमाची गाणी पाहाण्यात तिला जराही रस नसायचा. पण टी.व्ही घेतला आणि वर्षाच्या आतच अचानक दादा गेले. आई सैर-भैर झाली. टी.व्ही. पोरका झाला. दोघंही काही काळ चूपचाप बसून होती. शेजारी-पाजारी जाऊन बसण्यात आईला रस नव्हता. संधीवातामुळे बाहेर जास्त पडू शकत नव्हती. शेवटी एके दिवशी आईने टी.व्ही. लावला. बाहेरची कामं आधी दादाच करत. आता आई ती कामं पैसे देऊन करून घेऊ लागली. घरात दोनच माणसं. मुलगा आपल्या व्यापात. अशा वेळी आईची टी.व्ही.शी मैत्री झाली. निरनिराळ्या सिरीयल्समधल्या पात्रांच्या सुख-दु:खांशी ती एकरूप होऊन गेली.

संध्याकाळ झाली की तिला तिच्या कार्यक्रमांचे वेध लागायचे. कार्यक्रम सुरू होण्याआधी ती तिची संध्याकाळची सर्व कामं उरकून घ्यायची. त्यावेळी आतासारखं तीन-तीन, चार-चार वेळा कार्यक्रमांचं पुन:प्रक्षेपण नसायचं. त्याच्या त्या वेळी सिरियलला पाहून घ्यावं लागायचं. गेलं की गेलं. पाहुण्यांनीही सिरियलच्या आधी किंवा नंतर यावं असं वाटायचं आईला. तिने कधी आईच्या या वागण्याचा बाऊ केला नाही. पण तिचा मामा मात्र बऱ्याचदा म्हणायचा, ‘हल्ली ताईकडे जावंसंच वाटत नाही. तिला या कार्यक्रमांपुढे माझ्याशी बोलायला वेळच नसतो.-’ मामाच्या लक्षात हे येत नसे, की तो महिन्यातून एकदा फावल्या वेळी जाणार. बहिणीशी अर्धा तास बोलणार आणि निघून जाणार. पण सिरियलमधली माणसं तिचे रोजचे, एकाकीपणाचे, सुख-दु:खाचे सोबती तिचा विरंगुळा एक भाग पहायचा राहिला, तर पुढचे संदर्भ कसे लागणार?

कालांतराने मामा सेवानिवृत्त झाला. पुढे थकलाही. त्यानेही इडियट बॉक्सशी नातं प्रस्थापित केलं. त्यालाही त्या वेळात फोनवर बोलायलाही नकोसं वाटायला लागलं. सठीसामासी भेटणाऱ्या नातलगांपेक्षा इडियट बॉक्समधले रोजचे इडियट आपलेसे वाटू लागले. आता इतक्या वर्षांनी आई गेलेली आहे. तीही आईसारखी एकाकी झालीय. एकच सिरियल तिने पाहायला घेतलीय् आणि त्यात बुडून गेलीय. पुन:प्रक्षेपण चार-चारदा असतं. पण ज्यावेळचं त्यावेळी पाहायला उत्सुक असते ती. दिवसातून फक्त अर्धाच तास बसते ती इडियट बॉक्सच्या पुढ्यात. ह्या वेळी कसलाही व्यत्यय नको असतो तिला. फोन-बेल, डोअर-बेल काहीही नको असतं. हा इडियट बॉक्स तिचा प्रिय सखा झालाय. तिच्यासारख्या अनेक म्हाताऱ्या, आजारी, एकाकी, शिणलेल्या इडिट्सबरोबर प्रेमाचं नातं जोडलेला इडियट बॉक्स!

*

आरोग्यम्

# नेत्रदान

**-डॉ. छाया अजित देसाई**

ज्या व्यक्तींना नेत्रपटल अंधत्व (Corneal Blindness) आहे अशा व्यक्तींना नेत्रदानामुळे म्हणजेच नेत्रपटल प्रत्यारोपणाच्या (Corneal Transplant) शस्त्रक्रियेमुळे फायदा होतो व त्यांना दृष्टी येते. ही शस्त्रक्रिया यशस्वी होण्याचे प्रमाण जवळजवळ ९० टक्के आहे.

नेत्रपटल (Cornea) म्हणजे डोळ्याच्या बुबुळावरील पारदर्शक पडदा. हा पडदा दृष्टिसाठी मुख्य घटक आहे. हा पडदा काही कारणाने (उदा. रोग, ईजा, जंतूंचा प्रादुर्भाव) जर गढूळ (Cloudy) झाला, तर दृष्टी बऱ्याच प्रमाणात कमी होते. हा गढूळ झालेला पडदा जर शस्त्रक्रियेद्वारे बदलून त्याजागी जर निरोगी व पारदर्शक पडदा बसवला तर दृष्टी पूर्ववत चांगली होऊ शकते.

काही नवजात बालकांमध्ये उपजतच गढूळ नेत्रपटल (Cornea) असतो. अशा बालकांचे तर नेत्रदानामुळे (Corneal Transplant) उभे आयुष्यच बदलते.

**नेत्रदानाविषयी जाणून घेण्याजोगी माहिती**

१) नेत्रदान केवळ मरणोत्तरच केले जाते.
२) मृत्यूनंतर ४-६ तासांच्या आत डोळे काढावे लागतात.
३) नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकच डोळे काढू शकतात.
४) नेत्रपेढीची टीम घरी किंवा इस्पितळात डोळे काढण्यासाठी येते.
५) ही पूर्ण प्रक्रिया केवळ २०-३० मिनिटात होते. त्यामुळे अंतयात्रेसाठी विलंब होत नाही.
६) डोळ्यांबरोबरच थोडे रक्तही तपासणीकरिता घेतले जाते व मृत व्यक्तीला काही संसर्गजन्य रोग नाही ना; याचे निदान केले जाते.
७) डोळे काढल्यामुळे चेहरा विद्रूप होत नाही.
८) नेत्रदान करणारे व नेत्र प्राप्त होणाऱ्या व्यक्तींची माहिती गुप्त राखण्यात येते.

**नेत्रदान कोणत्या व्यक्ती करू शकतात?**

१) नेत्रदानाकरिता वयाची व लिंगाची कोणतीही अट नाही.
२) ज्या व्यक्ती चष्मा वापरतात त्या व्यक्तीसुद्धा नेत्रदान करू शकतात.
३) मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा असला तरीही नेत्रदान करता येते. फक्त नेत्रदान करणाऱ्या व्यक्तींना कोणताही संसर्गजन्य रोग नसावा. संसर्गजन्य नसलेल्या कोणत्याही व्याधी असतील तरी नेत्रदानात अडथळा येत नाही. नेत्रदान करणाऱ्या व्यक्तींना मोबदला घेता येत नाही. ते कायद्याने निषिद्ध आहे.

नेत्रदान करण्याची इच्छा असेल तर काय करावे लागेल?

सर्वात महत्त्वाचे म्हणजे घरातील जवळच्या व्यक्तींना व कायदेशीर प्रतिनिधींना सांगावे.

घरातील व्यक्तींना जर अगोदर कल्पना दिली असेल तर नेत्रदान करणे सोपे होते, जर नेत्रदानाकरिता ऑर्गन डोनर कार्ड भरले असेल तर ते घरातील व्यक्ती व इस्पितळाकरिता उपयुक्त होते.

जर मृत व्यक्तीने नेत्रदान करण्याची इच्छा प्रकट केली असेल तर घरातील मंडळींनी घेण्याची काळजी पुढे नमूद केली आहे.

१) मृत व्यक्तींच्या पापण्यांनी त्यांचे डोळे झाकावे.
२) मृत व्यक्तींच्या वर जर पंखा असेल तर तो बंद करावा; ज्यामुळे डोळे कोरडे होणार नाहीत.
३) मृताचे डोळे उशी ठेऊन वर करावे.
४) जवळच्या नेत्रपेढीला लवकरात लवकर सूचना द्यावी.
५) आपला पूर्ण पत्ता, घराजवळील खूण, दूरध्वनी क्रमांक सर्व नेत्रपेढीला व्यवस्थित द्यावे, ज्यामुळे त्यांना पत्ता शोधणे सुकर होईल.
६) मृत्युप्रमाणपत्र मिळाले असल्यास ते उपलब्ध असावे.
७) नेत्रदान हे, मृताच्या जवळच्या नातेवाईकांनी दोन साक्षीदारांच्या समक्ष लिहून दिले तरी होऊ शकते.

नेत्रदान केल्यानंतर

१) नेत्रदात्याच्या कुटुंबाला कौतुक प्रमाणपत्र नेत्रपेढीकडून दिले जाते.
२) डोळे नेत्रपेढीत नेल्यानंतर प्रशिक्षित कर्मचारी त्यांचे मूल्यमापन करतात.
३) काही चाचण्यानंतर डोळे, कॉर्निअल सर्जनकडे पाठवले जातात.
४) प्रतिक्षा यादी पाहून नेत्रदानाची गरज असलेल्या व्यक्तीशी संपर्क केला जातो.
५) त्यानंतर नेत्रपटल प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया केली जाते.

नेत्रदान करण्याकरिता ऑनलाईन रजिस्ट्रेशन करू शकता. इ.बी.ए.आय. ह्या साईटवर नेत्रदानासाठी रजिस्ट्रेशन फॉर्म आहे. तो भरला की नेत्रदान करू शकता.

किंवा

झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन सेन्टरलासुद्धा इमेल करून रजिस्ट्रेशन करू शकता.

organtransplant@ztccmumbai.org हे आपल्याला डोनर कार्ड पाठवतील. हे कार्ड सतत जवळ बाळगावे व घरातील व्यक्तींना त्याची कल्पना द्यावी.

# जीवनात ही घडी

**विहंग नायक**

*(विहंग नायक यांचा हा लेख 'प्रभुतरुण'मधून पुनर्मुद्रित'–संपादक)*

गेला महिना तसा बरा गेला. ज्ञातीत उत्साहाची लाट उसळली होती. आनंदाला पारावार उरला नव्हता. पद्मश्री मिळणारे श्री. सदाशिवराव गोरक्षकर पाठारे प्रभु ज्ञातीतील पहिले पाठारे प्रभु पद्मश्री ठरले. सतत इतिहासात रमणाऱ्या ह्या माणसाने स्वत:च इतिहास घडवला. पाठारे प्रभु ज्ञातीतील पहिले पाठारे प्रभु पद्मश्री तर ते ठरलेच पण म्युझिऑलॉजी क्षेत्रात पद्मश्री मिळवणारे ते पहिले भारतीय ठरले आणि त्यांचा हा विक्रम आता कायमचा अबाधित राहणार आहे. हा इतिहास घडवताना नकळतच त्यांनी साऱ्या ज्ञातीची शान वाढवली, प्रतिष्ठा वाढवली. सदाशिवरावांचा हा सन्मान समस्त ज्ञातीला आपला स्वत:चाच सन्मान वाटला आणि त्यामुळे त्या सन्मानावर हक्क सांगायला समस्त ज्ञात सज्ज झाली. गेल्या महिन्यात वेगवेगळ्या संस्थांकडून घडवून आणलेले सदाशिवरावांचे तीन स्वतंत्र सत्कार त्याचीच साक्ष होते. पाठारे प्रभु म्हणजे सोकाजी, खाण्यापिण्याचे फक्त शौकीन अशी टीकात्मक भूमिका घेणाऱ्या महाभागांना हे सत्कार म्हणजे चोख उत्तर होते. पाठारे प्रभु खाण्यापिण्याचे हौशी हे तर खरंच; पण त्या जोडीला जे उदात्त आहे त्याची आपुलकीच्या भावनेने पूजा बांधणं हाही ज्ञातीचा स्वभावविशेष आहे. स्थानिक पातळीवर असो, देशीय अथवा आंतर्देशीय असो; एखाद्या ज्ञातीयाने काही पराक्रम गाजवला की साऱ्या ज्ञातीत समूहसापेक्ष आनंदी प्रतिक्रिया उमटते. संपूर्ण ज्ञात एक कुटुंब बनते आणि त्या पराक्रम गाजवणाऱ्या व्यक्तीला आपलाच कुटुंबीय मानून त्याचं कोडकौतुक करायला सज्ज होते. जे जे मंगल, पवित्र त्याची पूजा बांधण्याचा हा ज्ञातीचा स्वभावधर्मच पूजनीय ठरतो. आम्ही ह्या ज्ञातीच्या श्रद्धाळू स्वभावविशेषावरच लट्टू आहोत. आमच्यासारखेच सारे ज्ञातीयही ह्या स्वभावाधर्मावर लट्टू असतील ह्याची आम्हाला खात्री आहे.

सदाशिवरावांचा पहिला सत्कार चॅरिटीजने केला. तो भाषणांनी आणि मानपत्रांनी गाजला. दुसरा सत्कार महिला समाजात केला तो खास महिला 'टच' होता. सदाशिवरावांच्या पत्नी सौ. गीताकाकी ह्यांच्या भाषणाने गाजला आणि तिसरा सत्कार केला 'प्रभात' आणि 'समाजा'ने. तो गाजला आरत्या, फटाके, चौघडा आणि तुतारींच्या निनादाने. पहिल्या सत्काराला आम्ही हजर होतो. आणि सत्काराचे भाषणही ठोकलं. दुसरा सत्कार दोनचार दिवसांनीच होता. त्यालाही भाषण देण्याकरता आम्हाला आमंत्रण होतं. पण आम्ही तो मुद्दामहून टाळला. दोन चार दिवसाच्या अंतराने हा दुसरा सत्कार असल्याने भाषणात पुनरावृत्ती होण्याचा धोका होता. पुन्हा श्रोते तेच असण्याची शक्यता होती. म्हणजे वक्त्याची मोठीच पंचाईत होती. आमचं हे अलीकडे असं बऱ्याच वेळा होतं. विषय तोच असतो आणि श्रोतेही बरेचदा तेच असतात. आम्ही त्यामुळे एक गोष्ट कटाक्षानं टाळतो. माईक समोर आल्यावर भाषणाला सुरवात करायच्या अगोदर 'मी काय बोलतोय हे तुम्हाला ऐकू येतंय का?' असा प्रश्न माईकवर टकटक करून आम्ही कधीही विचारत नाही. एकदा आम्ही तो प्रश्न विचारला, तेव्हा समोरच्याच रांगेत बसलेले दोन श्रोते उठले आणि म्हणाले ''हो आम्हाला तुम्ही काय बोलताय हे चांगलं ऐकायला येतेय. पण ज्यांना ते ऐकायला येत नाही त्यांच्याबरोबर जागा बदलायला आम्ही तयार आहोत.'' थोडक्यात भाषण देणं हा काही आमचा प्रांत नव्हे. तो प्रभातकारांचा प्रांत. त्यांनी बोलत राहावं आणि श्रोत्यांनी मंत्रमुग्ध होऊन ऐकत राहावं अशी स्थिती असते. आम्हीही त्या श्रोत्यातील एक. पहिल्या सत्काराला काही कारणास्तव प्रभातकार हजर नव्हते. त्यामुळे त्यांचं भाषण ऐकण्याची संधी हुकली. दुसऱ्या सत्काराला आम्ही हजर नव्हतो, पण प्रभातकारांनी उत्कृष्ट भाषण केल्याचं कळलं. तीही संधी हुकली. तिसऱ्या सत्काराला भाषणांनाच फाटा दिला होता. त्यामुळे त्याही दिवशी उपस्थित असून त्यांचं भाषण ऐकायला मिळालं नाही. प्रभातकार नुकतेच एका आजारातून उठले. आय.सी.यू.मधून बाहेरच्या रूममध्ये त्यांना आणण्यात आलं तेव्हा त्यांना भेटण्याकरिता आम्ही इस्पितळात गेलो होतो. डॉक्टरांनी त्यांच्या बोलण्यावर बंदी घातली होती. सतत बोलायला आनंदणारे प्रभातकार त्यावेळी गप्प होते. सरस्वती नेहमी त्यांच्या जीभेवर नाचत असते. त्या दिवशी सरस्वतीने आपली जागा फक्त बदलली होती. जीभेऐवजी त्यादिवशी ती त्यांच्या चेहऱ्यावरील हावभावावर नाचत होती. ते बोलत नव्हते. पण त्यांचा चेहरा बोलतच होता.

(पान ५ कॉलम १ वर)

# गणपती सजावट- सहा पिढ्यांची परंपरा

**विश्वास नारायण अजिंक्य**

आमच्या घरी १८४५ सालापासून गणपती येतो. आमच्या अजिंक्य कुटुंबातील गणपतीचे यंदाचे १७५ वे वर्ष. माझ्या पणजोबांचा जन्म १८४५ मध्ये झाला. त्या वर्षी त्यांचे आजोबा लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य यांनी आपल्याला झालेल्या नातवाच्या आनंदाप्रीत्यर्थ घरी गणपती आणण्याची प्रथा सुरू केली. आजच्या मुंबईकरांना लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य हे नाव कदाचित अपरिचित असेल. अगदी या गृहस्थाचा मुंबईच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा असला तरी या नावाने त्यांची ओळख पटणं कठीणच. पण या शहरातील प्रत्येकाला 'भाऊचा धक्का' तर माहीत असेलच. याच लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य यांनी भाऊचा धक्का बांधला. देश-परदेशातून माल वाहतूक करणाऱ्या बोटी आणि कोकणातील प्रवाशांसाठी समुद्र हटवून बंदर बांधण्याची किमया लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य ऊर्फ 'भाऊ रसूल' यांनी केली. मी त्यांचा सहाव्या पिढीतील वंशज. भाऊच्या धक्क्याइतकीच ऐतिहासिक परंपरा आमच्या घरच्या गणेशोत्सवालाही आहे. १८४५ ते १८९५ गिरगावात, १८९६ ते १९३५ परळला आणि १९३६ पासून आत्तापर्यंत प्रताप मॅन्शन, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर टी.टी. येथील घरात सहा पिढ्यांनी गणपती आणण्याची परंपरा जपली आहे.

या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे दीडशे-पावणेदोनशे वर्षांपूर्वी भाऊंनी गणेशोत्सवाची ज्या साहित्याने सजावट केली होती, त्याच वस्तूंनी आजही सजावट केली जाते. जुन्या काळातील जाड धाटणीची तांब्या-पितळेची भांडी, शिसवी लाकडाचे, मिश्र धातूचे मोठमोठे चौरंग, पितळेच्या मोठ्या समया, रिद्धी-सिद्धी, हरणाच्या आकाराची उदबत्तीची घरे, लामण दिवे, त्या काळात रॉकेलवर चालणारे दिवे-सारे काही आजही पूर्वीचेच आहे. सर्व सामान वंशपरंपरागत चालत आलेले आहे आणि आम्ही ते सांभाळून ठेवले आहे. गणपतीच्या पूजेतील पंचामृताची भांडी ही औरंगजेबाचे मुलगे आझम शहा व कामबक्ष यांच्या काळातील चलनी नाण्यांना चांदीचे जोडकाम देऊन बनवण्यात आली आहेत. गणपतीच्या मागचा आरसाही १५० वर्षांपूर्वीचा हातकारागिरीने बनविलेला आहे. पितळेच्या झांजादेखील पत्रा ठोकून बनविलेल्या आहेत. गणेशदर्शनाला येणाऱ्या लोकांना जुन्या काळातील आरास व तांबा, पितळ, बीड, जर्मन सिल्व्हर, चिनी माती यांपासून बनविलेल्या वस्तू बघून वेगळे काहीतरी बघितल्याचा आनंद होतो.

गणेश चतुर्थीच्या १५-२० दिवस आधीच संपूर्ण अजिंक्य कुटुंब तन-मन-धनाने कामाला लागते. घराची साफसफाई, आवराआवरी, तसेच आरासीसाठी वापरत असलेले चौरंग, समया, पूजेची भांडी हे सर्व घासूनपुसून चकचकीत करतो. आमचा गणपती गौरीबरोबर जातो. आमच्याकडे दरवर्षी एकाच प्रकारची मूर्ती आणली जाते.

आमच्या गणपतीच्या दर्शनाला अगदी लांबवरूनदेखील खूप लोक येतात. त्यामुळे हे ५-७ दिवस घर अगदी भरलेलं असतं. सारं घर गणपतीमय होऊन घराला एक उत्सवी रूप येतं. तेव्हाच्या प्रसन्न आणि आनंददायक वातावरणाचं वर्णन करणं अशक्यच आहे.

गिरगावात आणि परळला राहत असताना अथर्वशीर्ष, सहस्रावर्तन, इत्यादी धार्मिक विधी होत. गणेश यागदेखील होई. पुढे दादरला राहायला आल्यावर आमच्या इमारतीतील रहिवाशांच्या उत्साही सहभागामुळे दररोज साग्रसंगीत आरत्या होऊन गणेशोत्सव दणक्यात साजरा होऊ लागला. गौरी विसर्जनाच्या दिवशी आमच्या घरातील गणपतीच्या विसर्जनाची तयारी सुरू होते. त्या दिवशी बत्ताशाचा प्रसाद असतो.

गणेशोत्सवानंतर पूजेची भांडी, समया, लामण दिवे, चौरंग या सर्व वस्तू व्यवस्थितपणे कापडात गुंडाळून मोठ्या पेटाऱ्यात ठेवल्या जातात. आमच्याकडे तीन पिढ्यांपासून काम करणारा नोकरवर्गही या वस्तूंची योग्य ती देखभाल करतो. काळ बदलला किंवा वास्तव्याचे ठिकाण बदलले, तरीही गणेशोत्सव साजरा करण्याची आम्हा अजिंक्य कुटुंबाची रीत मात्र आजही एकोणिसाव्या शतकातीलच आहे व आजही गणेशोत्सव तेवढ्याच जल्लोषात आणि पारंपरिक वातावरणात साजरा केला जातो. त्यामुळेच आमच्या घरगुती गणपतीचे दर्शन घेताना भाविक कळत-नकळत जुन्याच काळात जातात. आम्ही वंशपरंपरागत चालत आलेल्या प्रथा-परंपरा स्वीकारल्या आणि सांभाळल्याही. आमच्या अजिंक्य कुटुंबातील प्रथा कालांतराने पुढची पिढी चालवेल, त्यानुसार त्यात काही नवीन गोष्टींचा समावेश होत राहील. आज इतकी वर्षे गणराय आमच्या घरात येतात हे आमचे, आमच्या वास्तूचे भाग्यच आहे.

---

(पान ४ कॉलम ४ वरून)

सदाशिवरावांच्या पहिल्या सत्काराला त्यांचं भाषण ऐकायला मिळालं नाही म्हणून रुखरुख लागली ती दुसऱ्या सत्काराला त्यांनी केलेल्या भाषणाचा वृत्तान्त ऐकून आणखीनच वाढली. त्या भाषणाचा वृत्तान्त आम्हाला आमच्या कार्यकारी संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकरांनीच दिला. आम्हाला हेही लक्षात आलं की, लोकमान्य टिळकानंतर 'गीतारहस्य' एव्हढं सुलभपणे सांगणारे प्रभातकारच. प्रभातकार असंही म्हणाल्याचं कळलं की 'सदाशिवरावांच्या हातात अशी जादू आहे की ते ज्या वस्तूला स्पर्श करतात ती वस्तूच पुरातन ऐतिहासिक होते.' प्रभातकारांच्या भाषणातले हे शब्द ऐकले आणि आम्ही हादरूनच गेलो. कारण दोनच दिवसांपूर्वी चॅरिटीजने केलेल्या सत्कारप्रसंगी आम्ही सदाशिवरावांचे हात हातात घेऊन त्यांचं पद्मश्रीबद्दल मन:पूर्वक अभिनंदन केले होते. सदाशिवरावांचा स्पर्श झाल्यामुळे प्रभातकार म्हणताहेत त्याप्रमाणे आपण आता पुरातन झालो की काय ह्या विचारानं आम्ही हादरून गेलो. आणि तशी शंका आम्ही खुद्द सुहासिनीबाईंकडे बोलून दाखवली. त्यावर त्या म्हणाल्या 'अहो, नवलकरांच्या भाषणातला भावार्थ लक्षात घ्या. पुरातन होणं म्हणजे इतिहासजमा होणं नव्हे. तर पुरातन होणं म्हणजे स्वत:च इतिहास घडवणं. आता तुमचंच बघा, सदाशिवरावांचा हस्तस्पर्श झाल्याबरोबर, इंग्रजी चित्रपटात काम करणारा पहिला पाठारे प्रभू म्हणून तुम्ही इतिहास घडवलाच की नाही?'' सुहासिनीबाईंचे हे शब्द ऐकले तेव्हा कुठे आमचा जीव भांड्यात पडला! आम्ही इतिहास घडवला की नाही त्याचं सोडा; पण स्वत: प्रभातकारांनी आतापर्यंत अगणित इतिहास घडवलेले आहेत. म्हणजे प्रभातकार आपल्या या बालमित्राशी अनेकदा हस्तांदोलन करीत असावेत. त्यांच्या आजवरच्या यशाचं हेच गुपित आहे की काय कुणास ठाऊक? पण प्रभातकार म्हणताहेत त्याप्रमाणे सदाशिवरावांकडे हा परीसाचा जादुई स्पर्श असणारच. परीसाचा गुणधर्म आहे की लोखंडाला स्पर्श होताच लोखंडाचं सोनं होतं आणि सोनं जितकं पुरातन तितकं जास्त चकचकीत व शंभर नंबरी असतं. असो थोडक्यात काय; गेला महिना बऱ्यापैकी गेला. ज्ञातीतील मरगळ थोडा काळ दूर सरली. जादुई स्पर्शाची किमया गेला महिनाभर ज्ञातीयांना भारून होती. वाटलं, जीवनातली ही घडी अशीच राहायला हवी. फेब्रुवारी महिना सरला, मार्च आला. वसंताची चाहूल लागली. गेल्या वर्षी वसंताच्या आगमनाबरोबर एका मागोमाग मृत्युलेख लिहायला लागले होते. सुदैवानं ह्या वर्षी तशी वेळ आली नाही. पुढेही येऊ नये ही प्रार्थना. मार्च म्हणजे परीक्षेचा महिना. वर्षभर घेतलेल्या श्रमाच्या कसोटीची वेळ. हृदयाची धडधड, उत्कंठा वगैरेंनी गच्च भरलेला महिना. होऊ घातलेल्या परीक्षेत भरपूर यश लाभो असा तमाम विद्यार्थ्यांना आशीर्वाद देत अग्रलेख संपवतो.

*

---

(पान २ कॉलम ४ वरून)

खरेदीसाठी खरेदी हा खरं तर मानसिक रोग आहे. काही लोकांना नव्याचा खूप सोस असतो. म्हणून सतत कपडे, सोफा, इतर फर्निचर, फ्रीज, पडदे, गालिचे, मिक्सर, मोटार - जे जे दिसेल ते ते जुनं झालं म्हणून बदलत सुटतात. माझ्या मैत्रिणीचा नवरा सतत घरं बदलतो - तीही भाड्याची नव्हे बरं का - चक्क ओनरशीपचे फ्लॅटस् बदलतो. त्याची आणि तिचीही नोकरी स्थिर होती म्हणून बरं. पण ह्या सततच्या घरबदलामुळे मैत्रीण जिकीरीला आलीय. काहींना वरचेवर नोकरी बदलायची खोड असते. कधी जास्त पगारावर तर कधी जुन्या नोकरीत कामाचं सॅटिसफॅक्शन नाही म्हणून (खरं तर नवी नोकरीही अगोदरच्या नोकरीपेक्षा खूपच सॅटिसफेक्शन देणारी म्हणूनच निवडलेली असते.) ह्या लोकांना नोकऱ्या पटापटा मिळतातही. नव्हे तशा त्या मिळवण्याची ताकद, कुवत त्यांच्यात असते. फक्त ती कुवत कुठे, कशी वापरायची याचं तारतम्य त्यांना नसतं. सदैव जास्त पैशांच्या मागे लागून नोकऱ्या बदलणं, तर कधी व्यवसाय बदलणं त्यामुळे खर्च करायला हातात खेळते पैसे खूप - परिणामी वस्तूंच्या किंमती वाढतायत. कॉर्पोरेट ग्रुपला आकर्षित करण्याच्या दृष्टिकोनामधला बाजार आता भरतो.

अफाट वेगानं जग पुढे जातंय. ह्या वेगानं डोळे गरगरताहेत, पायांचा तोल डगमगतोय, पावलं अडखळत, धडपडत ठेचकाळत पुढं जाण्याचा प्रयत्न करतायत. पण परिणामी मागेच पडतायत. इतका हा वेग अफाट आहे. वेगाचं नी परिणामी त्या वेगात पाचोळ्यासारख्या भिरभिरणाऱ्या माणसांचं, जगाचं तारु कुठे जाऊन धडकणार आहे कुणास ठाऊक.''

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर


## प्रभुतरुणास देणगी

∗ प्रभुतरुणाच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ श्री. इशान आणि कु. निष्का दीपक कोठारे यांजकडून रु. २००१/-

∗ सौ. निरूपा आणि श्री. अरविंद दुर्गाकांत व्यवहारकर यांजकडून सौ. निरूपाच्या मातोश्री कै. लक्ष्मी केशवराव धैर्यवान यांच्या जन्मशताब्दीनिमित्त रु. १००१/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## अभिनंदन

∗ 'माय नेम इज किंग' मधील 'टिमॉव'ला श्री. श्रेयस तळपदेंचा उसना आवाज लाभला आहे.

∗ मनोरमा प्रकाशनातर्फे 'पार्टी' ही सौ. उज्ज्वला र. ब्रम्हांडकर यांची कादंबरी प्रसिद्ध झाली.

∗ लोकसत्ता पूर्णब्रह्म प्रकाशानानिमित्ताने ठाणे येथील टिपटॉप प्लाझामध्ये नारळापासून केलेल्या खाद्यपदार्थांची स्पर्धा आयोजित केली होती. त्यात सौ. अमिता राजेश देसाई यांना उत्तेजनार्थ पारिताषिक लाभले. ११० स्पर्धकांमधून ही निवड झाली. सौ. अमिता यांनी परभांच्या 'केरोळ्या' केल्या होत्या. श्री. अभिजित खांडकेकर आणि श्री संकर्षण कऱ्हाडे यांच्या हस्ते हे पारितोषिक दिले गेले.

∗ कोकण मराठी साहित्य परिषदेत मुंबई जिल्ह्याच्या कार्यक्रम-मार्गदर्शिका म्हणून प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांची निवड झाली. दोन पुस्तक प्रकाशन समारंभात त्या प्रमुख पाहुण्या होत्या. श्रावण आणि पावसावरील कवितांच्या कार्यक्रमात त्यांनी अध्यक्षपद भूषविले व कविता सादर केल्या.

∗ लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले येथे सीताबाई गणेश पेठे स्त्री-शाखा आयोजित उपक्रमात शुक्रवार दि. १६-८-१९ रोजी 'तिहेरी तलाक बंदी व समज व गैरसमज' या विषयावर सौ. बागेश्री परीख यांचे व्याख्यान झाले.

∗ ज्योत्स्ना रंजन धैर्यवान यांनी धैर्यवान कुटुंबातील तीनशे वर्षांचा पुरातन बाजवट आणि मखर पुणे येथील पर्वती देवळात होऊ घातलेल्या वस्तु संग्रहालयासाठी देणगी म्हणून दिले. पुरातन वस्तूंचा हा संग्रह या देणगीमुळे भरीव होणार आहे. विशेष म्हणजे पेशव्यांच्या ब्राह्मण मंदिरातील या संग्रहालयात पाठारे प्रभुंच्या संस्कृतीचे यामुळे दर्शन घडणार आहे.

∗ वरद हर्षुल नायक यास आंतरशालेय कराटे स्पर्धेत 'कुमिते' विभागात रौप्य आणि 'कांता' विभागात सुवर्णपदक लाभले

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

∗

## परीक्षेतील सुयश

**बारावी (कॉमर्स)**

श्री. वेदांत नरेंद्र धैर्यवान-८९.२३%

**बी. ए. (इकॉनॉमिक्स)**

श्री. साहिल प्रशांत देसाई

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | | | |
|---|---|---|---|
| १८-७-१९ | श्री. श्रेयस राजीव देसाई, सौ. निकीता श्रेयस देसाई, | पुत्र | |

### नारळसाखर दिला

| | | |
|---|---|---|
| ११-८-१९ | श्री. निहाल तुषार कीर्तिकर | कु. खुशबू रुपक कोठारे |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २१-७-१९ | श्रीमती लता सत्येंद्रनाथ मानकर, | वय ८९, | अंधेरी |
| २२-७-१९ | श्री. पद्माकर मोरेश्वर रणजित, | वय ७९, | गोरेगाव |
| ०७-८-१९ | सौ. वंदना चित्तरंजन जयकर, | वय ७३, | कांदिवली |
| ०८-८-१९ | श्री. संदीप लालसेन कोठारे, | वय ६१, | बोरीवली |

(पान ३ कॉलम ३ वरून)

एक मुलगी आहे, अबला आहे तेव्हा तिनेच फक्त चौफेर बाबींचा विचार करावयाचा का? परंतु आजकालची मुलगी जरी आजच्या रीतीचे Fashion चे कपडे परिधान करत असली तरी तिला बहुदा सामाजिक भान आलेले दिसण्यात येते. गैरवागणूक करणाऱ्या व्यक्तीला कसे धारेवर धरायचे हे तिला बरोबर उमजले आहे व माहीतही आहे. म्हणजेच ती अबला नसून धीट झाली आहे व येणाऱ्या वादळाला तोंड देण्याची तिची तयारी दिसतेय. परंतु मानवाने जे निर्मिले आहे ते तसेच जर चालू राहिले तर मग पुढे काय? हा एक मोठा गहन प्रश्न आहे व तो अनुत्तरीत राहाता कामा नये; असे मला वाटते. त्याकरिता आपण सर्वांनी मिळून काहीतरी करावयास हवे. प्रथमत: आजच्या संगणक युगात स्त्री (वयोमर्यादा नाही) खरोखरच सुरक्षित आहे का? घरापासून ते थेट कार्यालयापर्यंत आणि इतर सार्वजनिक ठिकाणी? ह्या सर्वांचा नव्हे तर इथल्या मानसिकतेचा विचार करावयास हवा. आज इतकी प्रगती झाली आहे. तरीही माणूस इतक्या खालच्या पातळीला का पोहचतो? त्याला जबाबदार कोण? ह्याला उत्तर एकच व ते म्हणजे समाजच त्याला जबाबदार आहे. एक तर लहान वयात मुलांना ( म्हणजे मुलीही त्यात आल्याच) जे बाळकडू पाजायला हवे ते पाजले गेले नसेल व दुसरी गोष्ट म्हणजे समाजाचा धाक नसणे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, समाजात जे कायदे आहेत ते कठोर असायला हवेत.अपराधी उजळ माथ्याने वावरू शकतो ह्याचा अर्थ असा की, त्याला कोणाचीही व कशाचीही पर्वा नाही व भय तर मुळीच नाही. ह्या उलट ज्या मुलीला ह्या भयंकर कृत्याला बळी पडावे लागते किंवा सामोरे जावे लागते, तिच्या मनाच्या अवस्थेचा/मानसिकतेचा कधीही साधा विचार करीत नाही; तर पर्वा करणे दूरची गोष्ट मानावयास हवी. अगदी घरातील आपल्या लोकांपासून ते इतर दुसऱ्या किंवा बाहेरील परक्या लोकांपर्यंत म्हणजे अख्खा समाजच तिला वाळीत टाकण्याचा प्रयत्न करतो. तिला जवळजवळ आयुष्यातून उठवून टाकण्याचा प्रयत्न करतो. उलटपक्षी तिची काहीही चूक नसताना नराधमांच्या भूकेला बळी पडली असल्याने तिला मानसिक बळ देण्याचे काम आपण इतरेजनांनी करणे भाग आहे.तिला आपण दूषण देण्यात काय अर्थ आहे?

म्हणून म्हणते, लोकहो जागे व्हा! स्त्रियांकडे- मुलींकडे बघण्याची आपली मानसिकता बदला. हीच वेळ आहे मोकाट सुटलेल्या जंगली श्वापदांना वेसण घालण्याची, नव्हे पिंजऱ्यात पकडण्याची! त्यासाठी शिवाजी हा प्रत्येकाच्या घरात जन्माला आला पाहिजे व सामाजिक नीतीमत्ता व सुशासनाचा सर्वाकडे प्रभाव पडला पाहिजे! तरच आजच्या कलियुगाची ही वावटळ संपुष्टात येईल...

∗

## पत्र प्रतिक्रिया

सुहासताई,

'चंद्र नभीचा ढळला' हे संपादकीय छानच आहे. विशेष म्हणजे ती श्रद्धांजली आहेच; पण ज्या हातोटीने तू त्यातच बऱ्याच विषयांना हाताळलेस; ते वाचनाचा आनंद देऊन गेले.

'प्रभुतरुणा'चा पूर्ण अंकही आवडला. तू संपादक असलेल्या प्रभुतरुणाची साहित्यिक मूल्ये अशीच वाढत राहोत ह्या शुभेच्छा.

**-मिलींद कोठारे**

∗

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67